# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड  नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.२५** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- १२९** **दिनांक :-३१/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.२५/०७/२०२४ गुरुवार रोजी सकाळी- ११.३० वाजता झालेली सभा क्र.२४ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.२५/०७/२०२४ गुरुवार रोजी सकाळी- ११.३० वाजता झालेली सभा क्र.२४ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.२५/०७/२०२४ गुरुवार रोजी सकाळी- ११.३० वाजता झालेली सभा क्र.२४ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२५** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र.:- १३०** **दिनांक :-३१/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. मुख्यलेखाधिकारी,लेखा विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र.जशमनपा/लेखा/२९८/२०२४-२५ दि.२६/०७/२०२४

३. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.२४/०७/२०२४ रोजीचा अभिप्राय

**विषय :-** सन- २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे लेख्यास (जमा व खर्च) मंजुरी देणेबाबत.

---

वाचा क्र.१ व मुख्यलेखाधिकारी, लेखा विभाग यांचा वाचा क्र. २,३ मधिल प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०२३-२४ या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेखा विवरण पत्रात आरंभिची शिल्लक रु.२२४,३०,८६,७४७/- व भाग अ व क ची एकुण रक्कम रु.५६९,३४,७०,३४३/- मात्र इतकी रक्कम जमा असुन झालेला खर्च रक्कम रु.५२५,५७,११,१३४/- मात्र इतका आहे. वर्षा अखेर शिल्लक रक्कम रु.२६८,०८,४५,९५६/- आहे. तसेच भाग ब परिवहन विभागाचे जमा व खर्चाचे विवरण स्वतंत्र दाखविण्यात आले असुन त्यासह कुल एकुण रक्कम रु.७९३,६९,६६,१३३/- दाखविण्यात आली आहे. सदर शिल्लक रक्कमेत जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.जळगाव मधील रक्कम रु.२,८१,७८,१००/- मात्र समाविष्ट आहे.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे लेख्यास (जमा व खर्च) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ (१) चे तरतुदीनुसार मान्यता मिळणेसाठी मुख्यलेखाधिकारी, लेखा विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१,२,३ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.२५** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०३** **प्रशासक ठराव क्र.:- १३१** **दिनांक :- ३१/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहा.आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/१७/२०२४-२५ दि.२६/०७/२०२४
३. उपायुक्त (वाहन) यांचा दि.०८/०७/२०२४ रोजीचा अभिप्राय
४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.०९/०७/२०२४ रोजीचा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणे बाबत प्रस्ताव.

---

वाचा क्र.१ व सहा.आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ मधिल प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मनपा वाहनांसाठी दि.०४/०७/२०२४ अखेर डिझेल साठा ४९४५ लिटर शिल्लक असुन सदर डिझेल साठा ४ ते ५ दिवसांसाठी पुरवठा होईल इतका शिल्लक आहे.

मनपा वाहनांसाठी तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस अन्वये १२००० लिटर डिझेल खरेदी कामी रक्कम रु.११,०४,४८०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार मान्यता मिळण्याकरिता सहा.आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२५** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०४** **प्रशासक ठराव क्र.:- १३२** **दिनांक :- ३१/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./आस्था/१३९०/२०२४-२५ दि.३०/०७/२०२४

३. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.०२/०७/२०२४ चा अभिप्राय

४. मुख्य विधी सल्लागार यांचा दि.३०/०७/२०२४ चा अभिप्राय

५. उपायुक्त (सा.प्र.) यांचा दि. ३०/०७/२०२४ चा अभिप्राय

६. आयुक्त यांचा दि. ३०/०७/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** कंत्राटी मानधन तत्वावर निवड केलेल्या विविध पदावरील कर्मचाऱ्यांना ६ महिने (१७९दिवस) करीता पुर्ननियुक्त करणेबाबत.

आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांनी वाचा क्र. २ नूसार खालीलप्रमाणे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

| | |
|---|---|
| आस्थापना अधिक्षकांचा प्रस्ताव | जळगांव शहर महानगरपालिकेतील कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांची संख्या व त्या अनुषंगिक कामे लक्षात घेता अनेक अधिकारी / कर्मचारी यांचेकडेस एकापेक्षा अधिक कार्यभार सोपविण्यांत आलेले आहेत. सदयस्थितीत महानगरपालिकेत असलेले कर्मचाऱ्यांची संख्या ही १४४५ असुन अधिसंख्य कर्मचाऱ्यांसह १४६१ आहे. जळगांव शहराचा वाढता विस्तार पाहता संपुर्ण शहरासाठी आजमितीस २१५७ पदांच्या आकृतिबंधास दिनांक १६ फेंब्रुवारी २०२३ नुसार महाराष्ट्र शासनाकडुन मान्यता मिळालेली आहे परंतु सेवाप्रवेश नियमावलीस शासनाकडुन मान्यता मिळालेली नसल्याने आजमितीस सदरच्या रिक्त पदांची भरती प्रक्रिया करता आलेली नाही. जळगांव महानगरपालिकेच्या विविधागांमध्ये विविध पदांची आवश्यकता आहे.<br>मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे दि. २३/०९/२०२३ चे मान्यतेनुसार तात्पुरत्या स्वरुपात ६ महिने (१७९ दिवसांकरीता) जशमनपाच्या विविध विभागात ८६ उमेदवारांची जा.क्र./आस्था/१५१७ दि. २७/०९/२०२३ चे मान्यतेने जाहीरातीव्दारे विविध शैक्षणिक पात्रतेनुसार निवड करण्यात येऊन प्रत्यक्ष मुलाखतीअंती कनिष्ठ अभियता (बांधकाम) १० , कनिष्ठ अभियंता (पाणी पुरवठा) ३ , कनिष्ठ अभियंता (विदयुत) ४ , रचना सहायक ४, आरेखक २ अग्निशमन फायरमन १५ , विजतंत्री १२ , आरोग्य निरीक्षक १० व संगणक चालक २० अशी एकुण ८६ उमेदवारांची निवड करण्यांत आलेली होती. उपरोक्त निवड झालेल्या उमेदवारापैकी विविध कारणास्तव सदर पदाचा राजीनामा देऊन आजमितीस ७३ उमेदवार महानगरपालिकेच्या विविध विभागात कार्यरत होते. सदर कंत्राटी पध्दतीने पदभरती झालेल्या उमेदवारांसाठी सन २०२३-२४ व २०२४-२५ चे अर्थ संकल्पात रु.१,७५,००,०००/- ची आर्थिक तरतुद करण्यांत आलेली आहे.<br>जळगांव शहर महानगरपालिकेतील कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांची संख्या व त्या अनुषंगिक कामे लक्षात घेता अनेक अधिकारी / कर्मचारी यांचेकडेस एकापेक्षा अधिक कार्यभार सोपविण्यांत आलेले आहेत. तसेच महानगरपालिकेच्या आकृतिबंधानुसार मंजुर पदे २१५७ असुन १४४५ पदे कार्यरत व ७१२ पदे रिक्त आहेत व नजिकच्या कालावधीत मोठया |

| | |
|---|---|
| | प्रमाणावर कर्मचारी सेवानिवृत्त होणार असल्याने रिक्त पदांचे संख्येत भर पडणार आहे सबब सदयस्थितीत महानगरपालिकेत असलेले अपुर्ण कर्मचाऱ्यांची संख्या लक्षात घेता व विभागप्रमुखांच्या शिफारशीच्या अनुषंगाने तात्पुरत्या स्वरुपात करारपध्दतीने ६ महिने (१७९ दिवसांकरीता ) उपरोक्त ७३ उमेदवारांना पुर्ननियुक्ती करणेकामी उचित निर्णयास्तव सादर. |
| उपायुक्त (सा.प्र.) यांचा प्रस्ताव | सर्व विभागप्रमुख यांची मागणी तसेच कंत्राटी कर्मचारी यांचे कामकाजाबाबत विभागप्रमुख यांनी दिलेले अहवाल तसेच त्या अनुषंगाने आस्थापना विभागाचा प्रस्ताव विचारात घेऊन प्रशासकीय कामाची निकड लक्षात घेता प्रस्तावित केलेनुसार सेवा समाप्ती ते आदेश निर्गमित करेपर्यंतच्या दिनांक या कालावधीचा खंड देवून त्यांना मुदतवाढ / पुर्ननियुक्ती करणेंस शिफारस आहे. त्या अनुषंगाने मुख्य लेखा परिक्षक कार्यालयाचे अभिप्राय घेवुन प्रस्तावास मान्यता देणेस हरकत नाही. |
| मुख्य लेखा परिक्षकांचे अभिप्राय | यापुर्वी नमुद कंत्राटी पध्दतीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात (१७९ दिवसांकरीता) नेमणुक दिलेली होती. आस्थापना शाखेच्या वरील सादरीकरणामध्ये अशा कंत्राटी नियुक्तीच्या विभाग प्रमुखांनी व आस्थापना शाखेने अपुरे कर्मचारी असल्याने व कामाची निकड लक्षात घेता मुदतवाढ प्रस्तावीत केलेली आहे<br>सबब विभागाने नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार कंत्राटी कर्मचारी यांचे मुल्यमापन व कामाची अत्यंत निकड तपासावी व त्यानुसार यापुढे अशा कंत्राटी कर्मचाऱ्यांचे दायीत्व म.न.पा.वर येणार नाही , नियुक्तीस हक्क सांगता येणार नाही या आधारावर पुढील कार्यवाही निव्वळ तात्पुरती करावी. प्रस्तावित बाबत म.न.पा.अधि.१९४९ च्या ५३(3) प्रमाणे मा.महासभेच्या मान्यतेने पुढील उचित कार्यवाही करावी. |
| आयुक्त यांचा प्रस्ताव | विधी विभागाचे अभिप्राय घेवुन सादर करा. |
| प्रमुख विधी सल्लागार यांचा अभिप्राय | प्रस्तृत प्रकरणी कंत्राटी कर्मचारी यांना यापुर्वी ६ महिन्यासाठी (१७९ दिवस) तात्पुरत्या स्वरुपात दिल्याचे दिसुन येते. आता त्या कर्मचाऱ्यांना (कंत्राटी) सेवेत खंड देवुन पुन्हा नियुक्ती देण्याचा मानस नस्तीतुन दिसुन येतो परंतु हे करत असतांना त्यांची नियुक्ती ही 'पुर्ननियुक्ती ' अथवा ' मुदतवाढ ' अशा स्वरुपात न करता नविनच नियुक्ती देणे कायदेशीररित्या भविष्यात अडचणीचे ठरणार नाही. तसेच नियुक्ती पत्रात देखील सदर नियुक्ती ही विहीत कालावधीसाठी व तात्पुरत्या स्वरुपाची असेल असे स्पष्टपणे नमुद असावे. तसेच नियुक्ती पत्र दिले नंतर त्यातील अटी व शर्ती मंजुर असलेबाबत संमती प्रतिज्ञा पत्र घ्यावे तसेच सदर तात्पुरत्या व विशिष्ट कालावधीनंतर सदरची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल व त्यासाठी न्यायालयात अथवा कोणत्याही प्राधिकरणासमोर दाद मागता येणार नाही व त्या नियुक्ती पत्राचे आधारे कायमस्वरुपी नोकरीची मागणी करणार नाही असे नियुक्ती पत्रात स्पष्टपणे नमुद असावे. तसेच या व्यतीरिक्त इतर सर्व निकष उमेदवार कंत्राटी कर्मचारी पुर्ण करत असलेबाबत खात्री करुन घ्यावी. |
| आस्थापना अधिक्षक यांचा अभिप्राय | जळगांव शहर महानगरपालिकेकडील कार्यरत अधिकारी / कर्मचारी व आवश्यक अधिकारी / कर्मचारी यांची संख्या विचारात घेता कमी मनुष्यबळामुळे विहीत मुदतीत कामे करुन घेणेस विभागांना अडचणी येत असल्याने मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेकामीचे प्रस्तावास मा.आयुक्त यांचेकडील दि.८/७/२०२४ चे निर्देशानुसार जशमनपाचे विधी विभागाकडुन अभिप्राय मागविले असता म.मुख्य विधी सल्लागार यांनी अभिप्राय दिलेले असुन त्यामध्ये "उक्त कंत्राटी कर्मचारी यांची नियुक्ती ही पुर्ननियुक्ती अथवा मुदतवाढ अशा स्वरुपात न करता नविन नियुक्ती करणे कायदेशीररित्या भविष्यात अडचणीचे ठरणार नाही. तसेच नविन नियुक्ती पत्रात देखील सदर नियुक्ती ही विहीत कालावधीसाठी व तात्पुरत्या स्वरुपात असेल असे स्पष्टपणे नमुद असणे आवश्यक आहे व नियुक्ती पत्र दिलेनंतर रुजु करुन घेणेपुर्वी नियुक्ती आदेशातील विहीत |

| | |
|---|---|
| | केलेल्या त्यातील अटी व शर्ती संबंधितास मंजुर असलेबाबत संमतीपत्र प्रतिज्ञापत्र घेणेत यावे. सदर नियुक्ती तात्पुरत्या व विशिष्ट कालावधीनंतर आपोआप संपुष्टांत येईल व त्यासाठी मे.न्यायालयात अथवा कोणत्याही प्राधिकरणासमोर दाद मागणार नाही, नियुक्ती पत्राच्या आधारे कायमस्वरुपी नोकरीची मागणी करणार नाही इ.अटीचा देखील स्पष्ट उल्लेख करुन नियुक्ती आदेश व प्रतिज्ञापत्रात समावेश करणेंत यावा " या आशयाचे अभिप्राय प्राप्त झालेले आहेत.<br>सदर अभिप्रायाच्या अनुषंगाने तात्पुरत्या स्वरुपात नियुक्तीची बाब ही आर्थिक तरतुदीशी निगडीत असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ नुसार सदर प्रकरणी म.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक असलेने मान्यतेस्तव सादर. |
| उपायुक्त (सा.प्र.)<br>यांचा अभिप्राय | प्रमुख विधी सल्लागार यांचे अभिप्रायानुसार अटी-शर्ती विहित करुन प्रस्तावास मान्यता देणेस हरकत नाही. तथापि उचित आदेशार्थ सादर. |
| आयुक्त<br>यांचा अभिप्राय | अहवालानुसार मान्य. |

उपरोक्त प्रस्ताव व वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ५३ (३)क मधील तरतूदीनूसार व कलम ४५२(क) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने ६ महिने (१७९ दिवसांकरिता) ७३ उमेदवारांना विहीत अटी-शर्तीनूसार नव्याने नियुक्ती देणेस मान्यता देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**